


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे   अंक : १४४ वा शनिवार दि. १२ जुलै २०२५ पृष्ठ ८   किंमत ३ रुपये

# शरद पवारांच्या सेनापतीनं पद सोडलं जयंत पाटील प्रदेशाध्यक्ष पदावरुन पायउतार...

वृत्तसंस्था/मुंबई

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे त्यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा सोपवल्याचे समजते. नव्या प्रदेशाध्यक्षपदाच्या निवडीसाठी शरद पवार यांनी मंगळवारी पक्षातील नेत्यांची बैठक बोलावली असून या बैठकीत जयंत पाटील यांच्या जागी प्रदेशाध्यक्ष म्हणून शशिकांत शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं जाण्याची शक्यता आहे. जयंत पाटील हे आधी एकसंध राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेगळी वाट निवडल्यानंतर राष्ट्रवादीत उभी फूट पडली आणि त्यानंतर उदयास आलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यपदाची धुराही शरद पवार यांनी जयंत पाटील यांच्या खांद्यावरच देणे पसंत केले. जयंत पाटील हे शरद पवार यांचे गेल्या अनेक वर्षांपासूनचे निष्ठावंत सहकारी आहेत. मात्र पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून सलग दोन टर्म पूर्ण केल्याने आता नव्या चेहऱ्याला संधी मिळावी, अशी मागणी पक्षातील विविध नेत्यांकडून केली जात आहे. मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर अहिल्यानगर येथील विजयी मेळाव्यातही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या



मंचावर आमदार रोहित पवार यांनी अप्रत्यक्षपणे ही मागणी केली होती. त्यानंतर विधानसभा निवडणूक होईपर्यंत माझ्या पदाचे दिवस मोजत बसू नका, त्यानंतर मी स्वत:च या जबाबदारीतून मुक्त होईल, असं जयंत पाटलांनी सांगितलं होतं. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत त्यांनाच पदावर कायम ठेवलं जाईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. परंतु या निवडणुकांआधीच प्रदेशाध्यक्षपदावरून पायउतार होण्याचा निर्णय पाटील यांनी घेतल्याचं दिसत आहे. दरम्यान, जयंत पाटील यांच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या राजीनाम्याविषयी अद्याप राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मंगळवारी होणाऱ्या बैठकीवेळीच याबाबतची स्पष्टता येण्याची शक्यता आहे.

# विळ्याचा दाखविला धाक! गर्भवती शेतमजूर महीलेसोबत केले पाप!

जनसंचलन/मलकापूर

लोखंडी विळ्याचा धाक दाखवून एका गर्भवती शेतमजूर महिलेसोबत पाप केल्याची घृणास्पद घटना मलकापूर तालुक्यात घडली आहे.या घटनेतील दोन आरोपी फरार असून पोलीस तपास सुरू आहे. महिला सुरक्षिततेचा प्रश्न कायम असून, अत्याचाराचे प्रमाण वाढतच आहे.मलकापूर तालुक्यात



अशीच महिला अत्याचाराची घटना समोर आली आहे. तालुक्यातील एका गावात गर्भवती शेतमजूर महिलेवर दोन व्यक्तींनी लोखंडी विळा उगारत अत्याचार केला आणि पीडितेच्या सासु व पतीला मारहाण करून पोबारा केला आहे. गावातील एका शेतात पीडित महिला पती, मुलगा व सासूसह राहते. १० जुलै च्या रात्री साडेअकरा वाजता च्या दरम्यान मोहन साब्दया बरेला व त्याचा साथीदार पीडीतेच्या घरात घुसले.आरोपींनी लोखंडी विळा व वीटाने सासू व पतीला मारहाण करून जखमी केले.त्यानंतर पीडीतेला अपहरण करून बहापूरा शिवारातील बेलाड फाटा परिसरात नेऊन तिच्यावर दोघांनी अत्याचार केल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. पिडीतेने याबाबत पोलिसांना तक्रार दिल्यावरून आरोपींविरुद्ध विविध कलमान्वय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# घाणीचा आठवडी बाजार, डोणगावचे ग्रामस्थ बेजार! ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षाने बळावताहेत आजार!

जनसंचलन/ डोणगाव

संत गाडगेबाबांनी स्वच्छतेचा संदेश दिला परंतु, या संदेशाचे कुठे कुठे पालन होतांना दिसत नाही. डोणगाव ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे आठवडी बाजारात घाणीचे साम्राज्य नांदत असून, आजाराला आमंत्रण मिळत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने स्वच्छते संदर्भात योग्य पावले उचलून, सार्वजनिक आरोग्य जपावे, अशी मागणी करण्यात येत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून डोणगाव ग्रामपंचायतकडे बघितल्या जाते.विशेष म्हणजे येथील ग्रामविकास अधिकारी तत्पूर्वी निलंबित झाले असून,गावातील विकासकामेच रेंगाळली आहेत. ग्रामपंचायतीची उदासीनता पाहता,येथील आठवडी बाजारात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.



त्यामुळे व्यवसायिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून,साथ रोगांना आमंत्रण मिळत आहे. बाजाराच्या मागे भुसार यांच्या दुकानासमोर तसेच मटन मार्केट जवळ व मुत्रीघराजवळ प्रचंड घाण व दुर्गंधी असल्याने ग्रामस्थ व्यावसायिक पुरते हैराण झाले असून सार्वजनिक आरोग्य धोक्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरत आहे.

# जेसीबी विक्रीच्या सौद्यात फसवणूक! अश्लील शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी!

जनसंचलन/बोराखेडी

जेसीबी विक्रीच्या सौद्यातून फसवणूक झाल्याची तक्रार कुर्बान शहा मिस्किन शहा रा. कोथळी यांनी बोराखेडी पोलीस स्टेशनला दिली आहे. तक्रारीनुसार, कुर्बान शहा मिस्किन शहा यांच्या मालकीची जेसीबी विक्रीचा सौदा शेख नासिर शेख बशीर रा. कोथळी ता. मोताळा यांच्या सोबत पक्का झाला होता.तेव्हा जेसीबी ऑपरेटर पवन माळी रा.रामगाव तांडा ता. मोताळा हा सोबत होता. १५ जुलै २०२४ रोजी ६,००,००० रुपये नगदी देण्यात आले होते.सदर वाहनावर चोला मंडळ फायनान्स कंपनीचे २९,५०,००० रुपये कर्ज होते.सदर रक्कम शेख नासिर शेख बशीर व्याजासह भरणार असे त्यांनी सौदापत्रकात कबूल केलेले होते. तसेच वाहन निल होईपर्यंत ते वाहन कुर्बान शहा मिस्कीन शहा यांच्या नावावर राहील व वाहनाचे कर्ज निल झाल्यानंतर ते वाहन शेख नासीर शेख बशीर यांच्या नावे करून देणार असे ठरले होते.१५ जुलै २०२४ पासून सदर जेसीबी शेख नासीर शेख बशीर यांच्या ताब्यात दिली असून वाहनाची मूळ आरसी बुक सुद्धा दिले आहे.परंतु ते वाहनाचे नियमित हप्ते भरत नाहीत. त्यामुळे त्यांना याचा जाब विचारला असता त्यांनी जेसीबी तिसऱ्या व्यक्तीला विकल्याचे सांगून आता मी हप्ते भरणार असल्याचे ठणकावत कुर्बान शहा मिस्कीन शहा यांना अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत




धक्काबुक्की केली.त्यांच्या वडिलांना सुद्धा मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. जेसीबी ऑपरेटर पवन माळी याला सध्या जेसीबी कुठे आहे विचारले असता तो सांगायला तयार नाही. त्यामुळे पवन माळी व शेख नासिर शेख बशीर या दोघांनी तिसऱ्याशी संगणमत करून फसवणूक केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.मला माझी जेसीबी परत मिळावी अशी मागणी कुर्बान शहा मिस्किन शहा यांनी बोराखडी पोलिसांना केली आहे.

# सुरक्षेची ग्वाही व दंडुकेशाही

## संपादकीय लेख

सर्वसामान्यांच्या जगण्याच्या प्रश्नांना भिडताना कायद्याच्या राज्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करून समांतर यंत्रणा उभारणाऱ्या नक्षलवाद्यांचा, माओवाद्यांचा बीमोड होत असला, तरी त्यांचे आव्हान पुरते संपलेले नाही. त्यांना वैचारिकदृष्ट्या आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्यांना, ज्यांचा उल्लेख सरकारकडून ङ्ग शहरी नक्षलवादी म असा होतो, त्यांचे आव्हानही कायम आहे. त्यांच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राज्य सरकारने आणलेल्या जनसुरक्षा विधेयकावर विधानसभेची मोहोर उमटली आहे. ङ्गशहरी नक्षलवाद्यांफ्च्या कारवाया राज्यघटनेलाही आव्हान देणाऱ्या असल्याकडे अंगुलिनिर्देश करून सरकारने जनसुरक्षा विधेयकाचे हे पाऊल उचलले आहे. पुढील टप्पे पार करून हे विधेयक प्रत्यक्षात आल्यास ङ्गशहरी नक्षलवादाफ्च्या विरोधातील लढाईला कायद्याचे बळ प्राप्त होईल. या प्रस्तावित कायद्याचा गैरवापर होणार नाही, अशी हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे; परंतु विधेयकातील संदिग्ध तरतुदींबाबतच्या शंकांचे पूर्णपणे निरसन झालेले नाही. विधेयकातील व्यापक तरतुदी या राजकीय विरोधकांना आणि विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनाही जाचक असल्याची भीती व्यक्त करून विरोधी पक्ष, स्वयंसेवी संघटना, मानवाधिकार संघटना आणि पत्रकार संघटना यांनी त्यास विरोध केला होता. त्यानंतर काही तरतुदी शिथिल करून सादर झालेला नवा मसुदा कम्युनिस्ट वगळता आवाजी मतदानाने संमत झाला. मात्र, प्रस्तावित कायद्याच्या गैरवापराची भीतीही अनेकांनी व्यक्त केली. एकीकडे महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये माओवाद्यांचे कंबरडे मोडण्याच्या कारवाईला यश मिळते आहे. त्यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठराखण करणाऱ्यांना चाप लावणारे कायदे आंध्र प्रदेश, तेलंगण, ओडिशा आणि झारखंड या राज्यांत अस्तित्वात आहेत. त्यामुळे अशा विविध ६४ संघटनांनी त्यांची मुख्यालये महाराष्ट्रात हलवली आहेत. त्यांची बेकायदा कृत्ये रोखण्यासाठी येथेही अशा कायद्याची आवश्यकता नक्कीच आहे. त्या दृष्टीने या विधेयकात राज्यघटनेला आव्हान देणाऱ्या संघटनांवर बंदीच्या कारवाईची कार्यपद्धती ठरविण्यात आली आहे. त्यानुसार एखादी संघटना व्यवस्थेच्या विरोधात काम करत असल्यास आणि त्यासाठी हिंसाचार घडविण्याचा बेत असल्यास त्यावरील कारवाईबाबत उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, जिल्हा न्यायाधीश आणि सरकारी वकिलांच्या प्राधिकरणापुढे सुनावणी होईल आणि सरकारी पुराव्यांची छाननी झाल्यानंतर संबंधित संघटनेवर बंदी घालण्यात येईल. त्यास उच्च न्यायालयात आव्हान देण्याची मुभा अर्थातच आहे. या कायद्याचा दुरुपयोग होणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले असले, तरी आणीबाणीकालीन ङ्गमिसाफ ङ्गरासुकाफ तसेच ब्रिटिशकालीन देशद्रोहाचा कायदा, यांसह ङ्गपोटाफ्सारख्या अनेक कायद्यांचा सर्वच पक्षांच्या सरकारांनी त्या त्या वेळी गैरवापर केल्याचे दिसते. सक्तवसुली संचालनालयाकडून ङ्गपीएमएलएफ्मार्फत विरोधकांवर होणाऱ्या कारवाया, हे त्याचे ताजे उदाहरण. राज्यघटना आणि लोकशाही यांच्या विरोधात सामान्यांचे ङ्गब्रेनवॉशफ करणाऱ्या संघटनांवर कारवाईची तरतूद सध्याच्या कायद्यात नसल्याने या नव्या कायद्याची गरज सरकारला भासत आहे. ङ्ग एल्गार परिषद म प्रकरणी अनेक जण बराच काळ तुरुंगात आहेत. ते सर्व दोषी की निर्दोष, हे न्यायालय ठरवील; परंतु त्यांच्यावरील कारवाई ही सध्याच्याच कायद्यांनुसार झाली आहे. त्यामुळे आणखी एका कायद्याच्या आवश्यकतेबाबत प्रश्न राहतोच. कोणीही व्यक्ती, नेता किंवा पत्रकार यांना थेट अटक होणार नाही, या हमीचे प्रतिबिंब अंमलबजावणीतही उमटणे गरजेचे आहे. लोकशाहीच्या चौकटीत विरोधाचा आवाज उठवणाऱ्यांना सरसकट ङ्गशहरी नक्षलवादीफ म्हणणे भाषणांसाठी सोपे असले, तरी कायद्याने कारवाई करताना त्याची व्याख्या निश्चित करावी लागेल. लोकशाहीच्या मुळावर उठणाऱ्या, हिंसेला समर्थन देणाऱ्यांना चाप लागलाच पाहिजे; मात्र एकीकडे ङ्गकडव्या डाव्याफ संघटनांवर कारवाईची भाषा बोलतानाच ङ्गजहाल उजव्याफ संघटनांच्या कारवाया रोखण्यासाठी काय करणार, हा विरोधकांचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. एकीकडे ङ्गलोकशाहीतला काळा अध्यायफ म्हणून आणीबाणीचे स्मरण होत असतानाच ङ्गपोलिस राजफ्ला बळ देणारे नवनवे कायदे लागू होणे, हा योगायोग म्हणावा की विरोधाभास, असाही प्रश्न पडतो. कोणताही जहाल विचार रोखण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात; तर त्या विचारांच्या मुळाशी असलेल्या व्यवस्थेतील अन्याय-शोषणासारख्या त्रुटी खुल्या मनाने स्वीकारून त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करणे आणि जोडीने सर्वसमावेशक राष्ट्रवादाचा विचार अधिक बळकट करणे लोकशाहीसाठी आवश्यक आहे.

# सामाजिक बांधिलकी जोपासत शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

शहरातील सामाजिक क्षेत्रात काम करणारे अन्यायाला वाचा फोडणारे भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कर्दनकाळ ठरलेले राज्य शासनाकडून अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त झालेले चंद्रकांत खरात यांनी आपणाला व आपल्या परिवाराला या समाजाचे काहीतरी देणे लागते ही भावना मनात ठेवून शिक्षणाचे जरी व्यासपीठ उपलब्ध असले तरी आर्थिक परिस्थिती जेमतेम असलेल्या विद्यार्थ्यांना दिनांक ११ जुलै २५ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल मधील व इतर शाळेतील गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले त्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे यासाठी त्यांना श्री व्यंकटेश कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मधुकर जाधव यांनी व जानराव गायकवाड यांनी भरीव मदत केली. याबाबत सविस्तर असे की शहरासह जिल्ह्यात समाजपयोगी कामे व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सदैव प्रयत्नशील असणारे चंद्रकांत खरात यांनी या नगर परिषद चे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी अरुण मोकळ यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून गरजवंत शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा निर्णय घेतला व प्रत्यक्ष त्यांचे सहकारी प्रा. मधुकर जाधव यांना सोबत घेऊन शाळेला भेटी देऊन प्रत्येक वर्गात जाऊन ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम आहे त्यांची शिक्षण घेण्याची खूप इच्छा आहे मात्र घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे अपेक्षित असे शालेय साहित्य घेण्यामध्ये असमर्थ आहेत अशा विद्यार्थ्यांची निवड करून जवळपास ३८० गरजवंत विद्यार्थ्यांना स्कूल बॅग रजिस्टर पेन पेन्सिल व परीक्षेचे पॅड व इतर शालेय साहित्याचे वाटप केले यावेळी उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, मुख्याधिकारी अरुण मोकळ शाळेचे मुख्याध्यापक संजय देशमुख, प्रभारी पोलीस निरीक्षक आशिष रोही, नायब तहसीलदार सायली जाधव, एपीआय हेमंत शिंदे, संतोष जोगदंडे आगर प्रमुख चिखली, पंचायत समितीचे सहायक अभियंता अमोल इंगळे,कर निरीक्षक



न.प गणेश मुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ ज्योत्स्ना गवई सामाजिक कार्यकर्ते शाम गुजर, गजानन तिडके, , सन्मती जैन, मुशिर कोटकर, सौ पंचशीला खरात, संध्या सूर्यकांत खरात, बेबी चंद्रकांत खरात, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक चंद्रकांत खरात, प्राध्यापक मधुकर जाधव, मंगेश तिडके जानराव गायकवाड सचिन सुनगत सह या शाळेचे शिक्षक वृंद कर्मचारी शहरातील पत्रकार बांधव सामाजिक क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते तर ज्या ज्या विद्यार्थी , विद्यार्थिनींना हे शालेय साहित्य मिळाले त्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता. प्रास्तविक प्रा. मधूकर जाधव तर संचालन राजेश खोडचौरे व आभार विजय तायडे सर यांनी मानले.

# अपंग ६०००/- व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी यात्रेला पाठिंबा म्हणून जलाभिषेक

**जनसंचलन/ खामगाव**

अपंग बांधवांना ६००० रुपये संजय गांधी पेन्शन अनुदान वाढ करण्यासाठी शेतकरी यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यासाठी अपंगांचे नेते बच्चू कडू यांची अमरावती ते यवतमाळ पदयात्रा सुरू आहे.

या सर्वसामान्य जनतेच्या न्याय मागण्या करिता पाठिंबा म्हणून दिव्यांची संघटना असलेल्या विराट मल्टीपर्पज फाउंडेशन च्या वतीने अध्यक्ष मनोज नगर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली भगतसिंग चौक स्थित असलेल्या शिवमंदिर येथे दिनांक १४ जुलै २०२५ रोजी सकाळी दहा वाजता जलाभिषेक करून माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री द्वय यांना तहसीलदार खामगाव यांच्यामार्फत निवेदन सादर करणार आहे तरी सर्व दिव्यांग निराधार व शेतकरी बांधवांनी या जलाभिषेक कार्यक्रम साठी आवर्जून उपस्थित राहण्याचे करावे

असे विराट मल्टीपर्पज फाउंडेशन या दिव्यांग संस्थेच्या वतीने प्रहार शहराध्यक्ष शत्रुघन इंगळे मधुकर पाटील वसंत चिखलकर नीरज सुराणा विनोद पवार जळगाव जामोद येथील चंद्रकांत शिंदे अभिजीत डोंगरे, नांदुरा प्रकाश चोपडे, सुरेश खानाचंदानी, शेगाव संतोष निंबाळकर, दुर्गा ददगळ, संग्रामपूर दिलीप लऊळयांनीकेलेआहे

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ठाकरे बंधूंचं मनोमिलन, भाजपला टेन्शन; शहा-शिंदे भेटीत काय चर्चा? सायलेन्समुळे वाढली आशा...

**नवी दिल्ली:** गेल्या आठवड्यात मराठीच्या मुद्द्यावर ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा मुंबईत संपन्न झाला. एकत्र आलो आहोत, एकत्र राहण्यासाठी, अशा शब्दांत शिवसेना उबाठचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी मनसे प्रमुख राज ठाकरेंशी युती करण्याचे स्पष्ट संकेत दिले. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी बुधवारी संध्याकाळी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेतली. ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीचे महापालिका निवडणुकांवरील परिणाम याबद्दल दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. येत्या दोन ते चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकतात. त्यासाठी भाजपनं काही खासगी संस्थांच्या



माध्यमातून सर्व्हे केलेले आहेत. त्याची माहिती अमित शहांनी एकनाथ शिंदेंना दिली. महापालिका निवडणुका लांबणीवर टाकण्याच्या पर्यायापासून अन्य विषयांवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. दोन्ही ठाकरेंची युती झाल्यास त्याचा सर्वाधिक फटका शिंदेसेनेला बसण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शिंदेंनी अचानक दिल्ली गाठून शहांची घेतलेली भेट महत्त्वाची आहे.मुंबई महापालिका निवडणूक जिंकून तिथे आपला महापौर बसवण्यासाठी भाजपचे प्रयत्न सुरु आहेत. मुंबईत ठाकरेंची युती झाल्यास त्याचे कसे परिणाम होतील, याबद्दल भाजपच्या दिल्लीतील नेत्यांना चिंता वाटते. त्यातच भाजपचेच खासदार निशिकांत दुबे यांनी ठाकरे बंधूंना डिवचणारी विधानं केली आहेत. त्यांची काही वक्तव्यं तर महाराष्ट्र द्वेष दाखवणारी आहेत. त्यामुळे याचे काय परिणाम होणार याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.ठाकरे यांच्या विरोधात कठोर भूमिका घेतल्यास काय होईल, याबद्दल शहा आणि शिंदे यांच्यामध्ये चर्चा झाली. उद्धव यांनी राज ठाकरेंसोबत युती करण्याचे स्पष्ट संकेत दिलेले आहेत. पण राज यांनी टाळीसाठी हात पुढे केलेला नाही. त्यांनी आपल्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना शांत राहण्याचे, माध्यमांशी न बोलण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे राज यांचं मतपरिवर्तन होण्याची शक्यता कितपत आहे, यावरदेखील दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

ठाकरे बंधूंवर टिकेचा रोख ठेवल्यास मुंबईतील हिंदी मतदार महायुतीच्या मागे एकवटतील का? ठाकरे बंधूंची युती झाल्यास त्यांचा सामना करण्यासाठी मुंबईत अन्य कोणकोणत्या पक्षांना, नेत्यांना सोबत घेता येईल, अशा विविध विषयांवर शहा आणि शिंदे यांच्यात चर्चा झाल्याचं समजतं.

# पुण्यात स्पाच्या आडून देहविक्री बिनबोभाट, धनराज-प्रिया-अनुज त्रिकुटाचे शहरात १०० ठिकाणी काळे धंदे...

**पुणे :** शहरात स्पाच्या आडून सुरू असलेला वेश्याव्यवसाय दिवसेंदिवस फोफावत असून पोलिसांकडून होणारी कारवाई सातत्याने कमी होत असल्याचे चित्र आहे. धनराज, प्रिया आणि अनुज या त्रिकुटाकडून शहरात शंभरहून अधिक स्पा चालविले जात असून, पोलिसांना त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात यश आलेले नाही. विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत अलीकडेच गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत अवघ्या १५ वर्षांच्या मुलींना वेश्याव्यवसायात ढकलल्याचे दिसून आले. हा प्रकार अधिक चिंताजनक आहे. मानवी तस्करीच्या स्वरूपात अल्पवयीन मुलींना राज्याबाहेरून किंवा ग्रामीण भागातून शहरात आणले जात असून त्यांना जबरदस्तीने या धंद्यात आणले जात आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील बेकायदा स्पाचा आढावा घेतला असता भयानक चित्र समोर येते.संबंधित त्रिकुटाने सुरू केलेले




स्पा व्यवस्थापकांमार्फत चालविले जात असल्याचे पोलिस दलातील विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. पोलिस आयुक्तांनी याची गंभीर दखल घ्यावी आणि स्वतंत्र व सक्षम यंत्रणा उभारावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शंभराहून अधिक स्पा केंद्र चालविणारे त्रिकूट आणि त्यामागील गुन्हेगारी साखळी उद्ध्वस्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्याचीही मागणीही आहे. गुन्हे शाखेच्या काही यंत्रणांकडून अधूनमधून कारवाई केली जाते. मात्र, ती केवळ निवडक स्पा पुरती मर्यादित राहते. धनराज, प्रिया आणि अनुज या प्रमुख सूत्रधारांपर्यंत पोहोचण्यात पोलिस अपयशी ठरले आहेत. यामुळे या जाळ्याचे मुख्य चालक कोण, याचा शोध घेण्यापेक्षा पोलिस केवळ फुटकळ कारवाया करत असल्याचा आरोपही केला जात आहे.

# भांडताना रागात पत्नीने पतीवर त्रिशूल उगारला, तो थेट कडेवरील मुलाच्या डोक्यात..

## कोवळ्या जीवाचा हृदयद्रावक अंत




पुणे : दौंड तालुक्यातील केडगाव येथे हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. आंबेगाव पुनर्वसन येथे एका ११ महिन्याच्या बालकाचा त्रिशूल डोक्यात लागून मृत्यू झाल्याची घटना घडली. नवरा बायकोच्या भांडणातून ही धक्कादायक घटना घडल्याचे वृत्त आहे. याप्रकरणी यवत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे . वृत्तानुसार, सचिन मेंगवडे आणि त्याची पत्नी पल्लवी यांच्यामध्ये जोरदार भांडण सुरु होते. त्यांच्या राहत्या घरात वाद सुरु असताना पल्लवीची भावजय भाग्यश्री त्यांच्या ११ महिन्याच्या मुलाला घेऊन उभी होती. त्यांचे भांडण सोडविण्यासाठी भाग्यश्री घरात गेली. यावेळी पल्लवीने आपल्या हातातील त्रिशूलाने नितीन याला मारण्याचा प्रयत्न केला. मात्र हा त्रिशूळ नितीन याने चुकविल्याने तो शेजारी भावजयीच्या कडेवर असणाऱ्या अकरा महिन्याच्या बाळाच्या डोक्यात घुसला. त्रिशूलाचा प्रहार इतका भयंकर होता की, ११ महिन्याचे बाळ जागीच ठार झाले.घटनेची माहिती मिळताच यवत पोलीस घटनास्थळी दाखल झाले. आरोपी पल्लवी, तिचा नवरा व पल्लवीच्या दिरालाही ताब्यात घेत पुढील तपास सुरु केला आहे. निष्पाप बालकाला आपला जीव गमवावा लागल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.आरोपींनी घटनास्थळावर पडलेले रक्त व त्रिशुल कशाने तरी साफसफाई करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. अंधश्रद्धेतून हा प्रकार घडला आहे का? यादृष्टीने पोलीस तपास करत आहेत.

# तोट्यातील मार्गावर फुली; उत्पन्नवाढीसाठी पीएमपीकडून मार्गात बदल; ६४ नव्या मार्गावर सेवा सुरु...




**पुणे:** पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) उत्पन्न वाढविण्यासाठी कमी प्रवासी संख्या असलेले मार्ग बंद करण्यात येत असून, काही मार्गांत बदलही करण्यात आले आहेत. गेल्या महिन्यात चार मार्ग बंद करण्यात आले असून, ६४ मार्ग नव्या वेळापत्रकानुसार आणि ठिकाणानुसार बदलण्यात आले आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीकडून सार्वजनिक प्रवासी सेवा देण्यात येते. पीएमपीचे साधारण ३८१ मार्ग आहेत. दर वर्षी पीएमपीची संचलन तूट वाढत असून, तिकिटांतून मिळणारे उत्पन्न आणि होणारा खर्च यामध्ये अजूनही मोठी तफावत आहे. त्यामुळे पीएमपीने एक जूनपासून तिकीटदरात वाढही केली.त्यामुळे आता उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. परंतु, पीएमपी प्रशासनाकडून एवढ्यावरच न थांबता आता कमी उत्पन्न असलेले मार्ग बंद करण्यावर भर देण्यात येत आहे. शिवाय ज्या मार्गांवर उत्पन्न मिळत होते; मात्र वेळेचे नियोजन चुकत होते अशा ६४ मार्गांवर नव्याने बस सोडण्यात येत आहेत.त्यामुळे पीएमपीच्या उत्पन्नात वाढ होणार असल्याचा विश्वास पीएमपी प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. प्रवासी सेवा देण्याबरोबरच वार्षिक संचलन तूट कशी कमी करता येईल, यासाठी पीएमपीचे प्रयत्न सुरू आहेत.

पीएमपीकडून शहर आणि जिल्ह्यातील ३८१ मार्गांवर प्रवासी सेवा देण्यात येते. तिकीट दर वाढविण्यापूर्वी हे सर्व मार्ग तोट्यात होते. आता तिकीट दर वाढविल्यानंतर एका फेरीत होणारा खर्च आणि मिळणारे उत्पन्न यातील तफावत कमी झाली आहे. पीएमपीच्या प्रतिकिलोमीटर उत्पन्नात (ईपीके) सुधारणा झाली आहे. मात्र अद्याप सर्व मार्ग तोट्यातच आहेत. त्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पीएमपीकडून कमी उत्पन्न असलेले मार्ग बंद केले जात आहेत. सार्वजनिक वाहतूक सेवा देणे हे पीएमपीचे प्रमुख उद्दिष्ट आहे; नफा कमविणे नाही. कमी उत्पन्न असल्याचे सांगून मार्ग बंद केल्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे पीएमपीने बंद केलेले मार्ग सुरू करावेत, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. पीएमपीच्या ताफ्यात नव्याने बस दाखल झाल्यावर ६४ मार्गावर वेळेचे सुधारित नियोजन करून बस सोडण्यात येत आहेच. शिवाय ज्या मार्गावर उत्पन्न अत्यल्प आहे, असे चार मार्ग बंद केले आहेत.

---

# ऋषभ पंत तिसऱ्या कसोटीत खेळू शकणार की नाही, दुखापतीबाबत आली मोठी बातमी...



**लंडन :** ऋषभ पंतला तिसऱ्या कसोटीत खेळत असताना गंभीर दुखापत झाली. ही दुखापत एवढी गंभीर होती की, त्याने लगेच मैदान सोडण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर तो मैदानातत परतलाच नाही. पण आता ऋषभ पंतच्या दुखापतीबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. ऋषभ पंत आता तिसऱ्या कसोटीत खेळू शकणार की नाही, हे आता स्पष्ट झालं आहे. ही गोष्ट घडली ती ३४ व्या षटकात. त्यावेळी जसप्रीत बुमराह हा वेगवान गोलंदाजी करत होता. यावेळी जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीचा सामना करत होता तो इंग्लंडचा फलंदाज ऑली पोप. या षटकाच्या पहिल्या चेंडूनंतर ही गोष्ट घडल्याची पाहायला मिळाली. बुमराहने यावेळी लेग स्टम्पच्या दिशेने टाकला. बुमराह गोलंदाजी करीत असताना वेगवान चेंडू पंतच्या उजव्या करंगळीवर लागला. पंतला यावेळी दुखापत झाल्याचे कळले आणि संघाच्या डॉक्टरांनी मैदानात धाव घेतली. त्याच्या दुखावलेल्या बोटावर मैदानात उपचार करण्यात आले. पण ही दुखापत गंभीर असल्याचे पाहायला मिळाले त्यामुळे पाच चेंडूनंतर पंतने मैदान सोडले. त्याच्याऐवजी ध्रुव जुरेलने बदली यष्टीरक्षक म्हणून काम पाहिले. पंत त्यानंतर मैदानात परतलाच नाही. ऋषभ पंतला दुखापत झालयावर तो मैदानाबाहेर गेला. त्यानंतर तो पुन्हा मैदानात आलाच नाही आणि त्यामुळेच सर्वांना त्याची चिंता वाटायला लागली. पण आता पंतच्या दुखापतीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. पंतच्या करंगळीला चेंडू लागल्यावर त्याला सूज आली होती. पण त्यानंतर पंतने विश्रांती घेतली आणि त्याने आपल्या करंगळीवर बर्फ लावला. त्यामुळे त्याच्या करंगळीवरची सूज उतरली आहे. आता त्याची दुखापत जास्त गंभीर नाही. पण त्याला किती दुखतं, हे पाहिलं जाईल. पण पंत या कसोटीला मुकणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. पंत दुसऱ्या दिवशी किंवा फलंदाजीला मैदानात येऊ शकतो, असे आता समोर आले आहे.भारताचा यष्टीरक्षक तसेच उपकर्णधार पहिल्याच दिवशी जायबंदी झाला. त्यानंतर त्याने मैदान सोडले आणि पुन्हा तो परतलाच नाही. पण आता त्याच्या दुखापतीबाबतची माहिती समोर आली आहे. अजून त्याची दुखापत किती गंभीर आहे आणि तो आता तिसरा कसोटी सामना खेळू शकतो की नाही, याबाबतची अपडेट आता समोर आली आहे.

# गणेशोत्सव महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित; आशिष शेलार




**मुंबई :** मुंबई, पुण्यासह राज्यभरातील उत्सवासाठी लागेल तेवढा निधी राज्य सरकार खर्च करील. गणेशोत्सव उत्साहाने साजरा करणे ही महायुतीची आणि या सरकारची भूमिका आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांनी देखाव्यांच्या माध्यमातून आपले सैन्य, सैनिक, सामाजिक उपक्रम, ऑपरेशन सिंदूर, देशांतर्गत विकासाची कामे, आपले महापुरुष अशा सगळ्या गोष्टींचा विचार करावा. सामाजिक भान, पर्यावरणपूरक आणि उत्साहात साजरा होणारा हा गणेशोत्सव महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित करताना आनंद होत असल्याचे शेलार यांनी या वेळी नमूद केले. मुंबईसह राज्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणारा सार्वजनिक गणेशोत्सव यापुढे राज्य महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे. या संदर्भातील घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी गुरुवारी विधानसभेत केली. दरम्यान, या उत्सवासाठी आवश्यक निधी खर्च करण्याची तयारीही शेलार यांनी बोलून दाखविली.भाजप आमदार हेमंत रासने यांनी या संदर्भातील औचित्याचा मुद्दा गुरुवारी विधानसभेत उपस्थित केला. त्याला उत्तर देताना आशिष शेलार यांनी वरील घोषणा केली. ही मागणी करताना हेमंत रासने म्हणाले, ङ्गसार्वजनिक गणेशोत्सवाने राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते घडविण्याचे काम केले, प्रबोधनाची परंपरा चालविली. शतकाचा वारसा असलेल्या या उत्सवावर निर्बंधांचे प्रमाण वाढत आहे.फया उत्सवासाठी शंभर कोटींच्या निधीची तरतूद करावी, अशी मागणीही रासने यांनी केली.यावर आशिष शेलार म्हणाले, ङ्गसन १८९३मध्ये लोकमान्य टिळक यांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. या उत्सवाची पार्श्वभूमी सामाजिक, राष्ट्रीय, स्वातंत्र्य, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे. त्या पद्धतीनेच हा उत्सव आताही सुरू आहे. महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असावा असा हा आपला गणेशोत्सव आहे. त्यामुळेच सार्वजनिक गणेशोत्सव आता महाराष्ट्राचा राज्य महोत्सव असेल.फजगभरात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचारासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

# भाजपच्या घटनेत निवृत्तीवयाची तरतूद आहे का?

# भागवतांच्या वक्तव्यानंतर संघाचं स्पष्टीकरण काय?


**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी दिवंगत संघनेते मोरोपंत पिंगळे यांचे उद्गार उद्धृत करून नुकत्याच केलेल्या विधानानंतर, वयाच्या ७५ व्या वर्षी निवृत्तीबाबत पुन्हा एकदा राजकीय वादाचा धुरळा उडाला आहे. विरोधकांनी भागवत यांच्या विधानाचा संबंध पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वयाशी जोडल्यानंतर, भागवतांच्या बोलण्याचा विपर्यास केल्याचे स्पष्टीकरण संघवर्तुळातून देण्यात आले. भाजपच्या घटनेत सध्या निवृत्तीवयाची कोणतीही तरतूद नसल्याचे सांगण्यात आले. नागपूरमधील एका कार्यक्रमात सरसंघचालकांनी पिंगळे यांचे उद्गार उद्धृत केले. ङ्ग७५ वर्षांची शाल पांघरली, याचा अर्थ आता तुम्ही त्या वयात पोहोचला आहात, थोडे बाजूला व्हा,फ असे पिंगळे यांनी म्हटले होते. डॉ. भागवत व



पंतप्रधान मोदी येत्या सप्टेंबरमध्येच ७५ वर्षांचे होत आहेत. हा धागा पकडून याचे राजकारण सुरू झाले आहेभाजपमध्ये ७५ वर्षांच्या वयात निवृत्तीचा नियम आहे का? हा मुद्दा समोर आणून विरोधक मोदी यांची कोंडी करण्याचा प्रयत्न करतात. आपने लोकसभा निवडणुकीत प्रचाराच मोदी सप्टेंबरमध्ये निवृत्त होणार असल्याचा प्रचार केला होता. मात्र, ङ्गभाजपच्या घटनेत ७५ व्या वर्षी निवृत्तीचा उल्लेख नाही. पंतप्रधान मोदी ७५ वर्षांचे झाले, तर त्यामुळे कोणाला आनंदी होण्याची गरज नाही. मोदी हा कार्यकाळ पूर्ण करतील व भविष्यातही देशाचे नेतृत्व करीत राहतील,फ असे मागच्या वर्षी लोकसभा निवडणुकीदरम्यान भाजप नेते अमित शहा यांनी स्पष्ट केले होते.अमित शहा हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष असताना, पक्षाने २६ ऑगस्ट २०१४ रोजी पक्षासाठी मार्गदर्शक मंडळ निर्माण करून त्यात वरिष्ठ नेत्यांची नियुक्ती केली होती. या यादीत अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी यांच्यासह मोदी आणि राजनाथ सिंह यांची नावेही होती; परंतु भाजपची सर्वांत शक्तिशाली संस्था असलेल्या संसदीय मंडळाची फेररचना करून वाजपेयी, अडवाणी व जोशी यांना वगळल्यानंतर, मार्गदर्शक मंडळाला ङ्गनिवृत्तांचे मंडळफ मानण्याची चर्चा सुरू झाली होती. २०१६ नंतर प्रत्येक निवडणुकीत ७५ वर्षांपेक्षा ज्येष्ठ नेत्यांना तिकीट देणार नाही, अशी चर्चा होऊ लागली. भाजपने तत्कालीन लोकसभाध्यक्षा सुमित्रा महाजन यांच्यासह अनेकांबाबत याचे पालन केले. यातही कर्नाटकाचे बी. एस. येडियुरप्पा, पंजाबचे कॅप्टन अमरिंदरसिंग, २०२१ च्या केरळ विधानसभा निवडणुकीतील भाजप उमेदवार ८८ वर्षीय ई. श्रीधरन यांच्यासारखे अपवाद ठेवले. सरसंघचालकांनी असे सुचवले आहे, की ७५ वर्षांनंतर व्यक्तीने इतरांसाठी मार्ग मोकळा करावा. या विधानामुळे सर्वांना आनंद झाला पाहिजे. कारण यातून भारतासाठी, संविधानासाठी आणि देशाच्या आत्म्यासाठी अच्छे दिन येत आहेत. कारण नरेंद्र मोदी आणि मोहन भागवत जाणार आहेत,फ अशी उपरोधिक टीका काँग्रेसने केली.भागवत यांनी एक चांगली बातमी दिली. ते म्हणाले, ७५ वर्षांचे झाल्यानंतर, दुसऱ्याला संधी दिली पाहिजे. गेल्या ११ वर्षांत त्यांनी (मोदींनी) देशाला, संविधानाला आणि संवैधानिक संस्थांना ज्या स्थितीत आणले आहे, त्यातून आपल्याला १७ सप्टेंबर रोजी मुक्तता मिळेल आणि १७ सप्टेंबर हा दिवस त्यातून मुक्त होण्याचे पहिले पाऊल असेल,फ अशी टीका काँग्रेस नेते पवन खेरा यांनी केली.

# पती, पत्नी और वो! दोघांच्या संसारात तिसऱ्याची लुडबूड; मानसिक त्रासाला कंटाळून पतीने दिला जीव

**पुणे :** पत्नी आणि तिच्या मित्राच्या सततच्या त्रासाला कंटाळून एका ३९ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना नाना पेठ परिसरात समोर आली आहे. या प्रकरणी महिलेविरोधात आणि तिच्या मित्राविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अतुल मारुती कदम (वय ३९, रा. बालाजी कॉम्प्लेक्स, पिंपरी चौक, नाना पेठ) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून, त्याच्या आई माधुरी मारुती कदम (वय ६१) यांनी समर्थ पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार, पत्नी सोनाली अतुल कदम (वय ३१, रा. साडेसतरानळी, हडपसर) आणि तिचा मित्र कृष्णा शिंदे (रा. हडपसर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अतुल आणि सोनाली यांचा विवाह २०१५मध्ये झाला होता. मात्र, विवाहानंतर दोघांमध्ये सातत्याने वाद होत होते.अतुलला पत्नी सोनालीचे कृष्णा शिंदेशी घनिष्ठ संबंध असल्याचे लक्षात आले. त्यामुळे पती-पत्नीमध्ये वाद अधिकच वाढले आणि सोनाली वेगळी राहू लागली. त्यानंतर सोनाली व तिचा मित्र कृष्णा शिंदे यांनी अतुलला फोनवरून धमकावले. या मानसिक छळाला कंटाळून अतुल यांनी १५ जून २०२५ रोजी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. अतुलच्या आईने दिलेल्या तक्रारीत, पत्नी आणि तिच्या मित्राने दिलेल्या




मानसिक त्रासामुळेच आत्महत्या केल्याचा उल्लेख आहे. या प्रकरणाचा तपास समर्थ पोलिस करीत आहेत.पतीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नी सोनाली कदमला पुणे पोलिसांनी गुरुवारी अटक करून न्यायालयात हजर केले. या प्रकरणात आरोपी कृष्णा शिंदेचा शोध घ्यायचा आहे. दोन्ही आरोपींनी संगनमताने अतुल कदमला वारंवार मानसिक त्रास देऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले असून, त्यामागे आरोपींचा काय उद्देश होता; तसेच गुन्हा करण्यासाठी आरोपींना आणखी कोणी प्रोत्साहित केले आहे का, याचा तपास करायचा आहे. आरोपींचे मोबाइल जप्त करून आणखी पुरावे गोळा करायचे आहेत आणि साक्षीदारांकडे चौकशी करायची आहे. त्यासाठी आरोपी सोनाली कदमला पोलिस कोठडी द्यावी, अशी मागणी सरकारी वकील रेणुका देशपांडे-कर्जतकर यांनी केली. ती ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला १३ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

# गिरणी कामगारांसाठी मुंबई परिसरातच घरे देण्याचा उपमुख्यमंत्री शिंदेंच्या बैठकीत अखेर निर्णय....



**मुंबई :** मुंबईतील गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काचे घर मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. कुठल्याही पात्र गिरणी कामगाराला घरापासून वंचित ठेवले जाणार नाही, याची काळजी सरकार घेत आहे. मुंबई शहर व लगतच्या परिसरात जिथे जागा उपलब्ध असेल, अशा ठिकाणी गिरणी कामगारांना घरे बांधून देण्यात येतील, असा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीत घेतल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत गुरुवारी दिली. आझाद मैदानावर गिरणी कामगारांच्या आंदोलनाला भेट दिल्यानंतर दिलेल्या आश्वासनानुसार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गिरणी कामगारांच्या संघटनांच्या प्रतिनिधींसोबत विधिमंडळात बैठक झाली. या बैठकीत कामगारांना घरे देण्याबाबत विविध निर्णय घेण्यात आले. शेलू येथील घरे घेण्याबाबत गिरणी कामगारांना कुठलीही सक्ती करण्यात आली नाही. असा कुठलाही निर्णय झाला नसताना अपप्रचार करण्यात येत आहे, असे मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.शेलू येथील घरे घेणे गिरणी कामगारांना सक्तीचे नसून ऐच्छिक आहे. तसेच २०२४मध्ये घर न घेतलेल्या गिरणी कामगारांचा घराचा दावा संपुष्टात येईल, असे होणार नसून यासंदर्भातील शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक १७रद्द करण्याचा निर्णयही शिंदे यांनी घेतला आहे, असे त्यांनी सांगितले. शेलू येथील घरे घेण्याबाबत गिरणी कामगारांना कुठलीही सक्ती करण्यात आली नाही. असा कुठलाही निर्णय झाला नसताना अपप्रचार करण्यात येत आहे, असे मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.शेलू येथील गिरणी कामगारांना झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात घरे मिळवून देण्याबाबत कोटा निर्माण करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे मुंबई शहरातील मिठागरांच्या जागांवर गिरणी कामगारांच्या घरांसाठी मिळण्याबाबत केंद्राला विनंती करण्यात येत असून गिरणी कामगारांना न्याय देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पूर ओसरला, समस्या कायम; संतप्त नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयातच चूल मांडली...



**भंडारा:** शहराला लागून असलेल्या राष्ट्रीय महामार्गावर अशोकनगर-फुलमोगरा ते शिंगोरी हानवीन बायपास मार्ग तयार करण्यात आला. परंतु, निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे पहिल्याच पावसात हा रस्ता ठिकठिकाणी खचला. विविध ठिकाणी रस्ता दबला असून पिचिंग व बॅरिकेड्स् तुटलेले आहेत. भंडारा शहरात महामार्गाच्या रुंदीकरणाकरिता जागा नसल्याने फुलमोगरा ते शिंगोरीदरम्यान बायपास मार्ग तयार करण्यात आला असून कोरंभी येथे वैनगंगेवर मोठा पूलही बांधण्यात आला आहे. मात्र, या रस्त्याचे काम सुरू असताना घाईघाईत काम केले जात असल्याचा आरोप काही जणांनी केला होता. मागील आठवड्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या मार्गाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सोमवारपासून झालेल्या संततधर पावसामुळे बायपास मार्गावरील सर्व ठिकाणी पिचिंग व लावलेले बॅरिकेड्स पाण्याने वाहून गेले. भिलेवाडा, पलाडी या गावांजवळ रस्त्याची अवस्था इतकी खराब झाली की, कंत्राटदाराकडून दुरुस्ती करूनही रस्त्याची अवस्था बिकटच आहे. जागोजागी रस्ता दबलेला आहे. पीचिंग वाहून गेले, तर बॅरिकेड् तुटलेले आहेत. हा रस्ता अजूनही पूर्ण झालेला नाही. पलाडी गावाजवळील जंक्शनवर कोका, पलाडी, टेकेपार या गावांना जाण्यासाठी अंडरपाससुद्धा दिलेले नाही.संततधार पावसामुळे जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली. पावसाचा जोर ओसरल्यानंतर पूरही ओसरला. परंतु, दरवर्षी पुराचा फटका बसणाऱ्या गावांच्या समस्या मात्र कायम आहेत. गोसेखुर्द धरणाच्या बॅकवॉटरमुळे दरवर्षी बाधित होणाऱ्या गावांचे तत्काळ पूनर्वसन करण्यात यावे, या मागणीसाठी गावकऱ्यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. कार्यालयाच्या आवारात चूल मांडण्याचा प्रयत्न केला. अखेरीस २२ बाधित गावांचे तत्काळ पूनर्वसन करण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. गोसेखुर्द धरणातील पाणी अडवल्याने नदी आणि नाल्यांचे बॅकवॉटर अनेक हेक्टरपर्यंत पोहोचले. पुराचे पाणी गावात शिरल्याने दरवर्षी शेकडो लोकांना समस्यांना तोंड द्यावे लागते. गेल्या सहा वर्षांपासून गावकरी या गावांच्या पुनर्वसनाची मागणी करीत आहेत. याहीवर्षी सलग दोन दिवसांच्या पुरामुळे गावकऱ्यांचे प्रचंड हाल झाले. पुरामुळे कारधा, भोजापूर, खमारी, चिचखेडा या गावांमध्ये पाणी शिरले. घरे उद्ध्वस्त झाली. दरवर्षी होणाऱ्या या प्रकारामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गावकऱ्यांनी गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात चूल मांडून अनोखे आंदोलन केले. चूल पेटविण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी तो हाणून पाडला. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांनी कार्यालयाच्या आवारात येऊन प्रकल्पग्रस्तांशी चर्चा केली. मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा पवित्रा प्रकल्पग्रस्तांनी घेतला. अखेरीस गावांचे पुर्नवसन करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

# आमच्या वेळी नव्हतं असलं काही एन्झायटी अटॅक वगैरे, आता इंटरनेटमुळे... नातीच्या पॉडकास्टमध्ये काय बोलून गेल्या जया बच्चन?



**मुंबई:** आपल्या रोखठोक वक्तव्यांमुळं ज्येष्ठ अभिनेत्री जया बच्चन सोशल मीडियावर चर्चेत असतात. अनेकदा त्यांना ट्रोलही केलं जातं. आता पुन्हा एकदा त्या सोशल मीडियावर ट्रोल होत आहेत. नुकत्याच त्या नात नव्या नवेली नंदा हिच्या पॉडकास्टमध्ये सहभागी झाल्या होत्या. तिथं त्यांनी इंटरनेट हे एन्झायटी अटॅकचं कारण असल्याचं म्हटलं. हे ऐकून नेटकऱ्यांनी त्यांना धारेवर धरलं आहे. जया बच्चन यांनी इंटरनेटला तणावाचं, टेन्शनचं कारण मानलं आहे. नव्या नवेलीच्या पॉडकास्टमध्ये जया बच्चन त्यांची मुलगी श्वेता बच्चनसोबत पोहोचल्या होत्या. या दरम्यान त्यांनी अनेक मुद्द्यांवर मनमोकळी चर्चा केली. याच दरम्यान त्या म्हणाल्या, नव्या, तुमच्या पिढीमध्ये तर हेच होतं की कॉलचं उत्तर लवकर द्या, मेसेजचं उत्तर लवकर द्या. जेव्हा आम्ही लहान होतो, तेव्हा आम्ही एन्झायटी अटॅक वगैरे असं कधी काही ऐकलंच नव्हतं. लहानपणीचं सोड, पण आत्ता यावयातही आम्ही असं काही ऐकलं नाहीये. ही तुमची पिढी इंटरनेटमुळंच जास्त तणावात आहे.जया बच्चन यांच्या वक्तव्याला लेक श्वेतानं पाठिंबा दिला नाही. ती म्हणाली की, चिंता नेहमीच होती. पण यावर बोलणं होत नव्हतं. आता हे सर्व जास्त बोललं जात आहे.सोशल मीडियावर युजर्सनी जया बच्चन यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरनं लिहिलं की, ङ्गमला तर ऐश्वर्या आणि आराध्यासाठी वाईट वाटत आहे..फ दुसऱ्यानं लिहिलं की, ङ्गयांची तर पूर्ण फॅमिलीच टॉक्सिक आहे. सगळे एकमेकांना कमी लेखतात.फ या व्यतिरिक्त एका युजरनं म्हटलं की, ङ्गसगळ्यात चिडचिडी स्त्रिया तणावाच्या गोष्टी करतात. हे बघून मला ताण येतो.फ एका युजरनं कमेंटमध्ये म्हटलं की, ङ्गहे तर टिपिकल इंडियन फॅमिलीसारखे आहे भाऊ..फ जया बच्चन यांचं म्हणणं आहे की, इंटरनेटमुळं लोकांना येतात, कारण लोकांना सतत मेसेज आणि कॉल्स ला उत्तरं देण्याची घाई असते. त्यांच्या मते त्यांच्या लहानपणी त्यांनी याबद्दल ऐकलं सुद्धा नव्हतं, कारण त्यावेळी इंटरनेट नव्हतं.

# एक-दोन नव्हे, पाच माजी आमदारांनी सोडली मविआची साथ

**जळगाव :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. विधानसभेत निर्विवाद वर्चस्व मिळविलेल्या राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीमधील घटक पक्षांमध्ये उत्साह आहे, तर निवडणुकीत पराभव झालेल्या महाविकास आघाडीचे आतापर्यंत जळगाव जिल्ह्यातील पाच माजी आमदारांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी ङ्गसत्ताधारीफ गोटात प्रवेश केल्याने विरोधकांसाठीआगामी निवडणुकांमध्ये कस लागणार आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. मात्र, जळगाव जिल्ह्यातील दोन्ही जागांवर महायुतीतील भाजपचेच दोन्ही उमेदवार निवडून आले. त्यापाठोपाठ झालेल्या विधानसभा निवडणुकीतदेखील जळगाव आघाडीतील एकाही पक्षाचा उमेदवार निवडून न आल्याने या पराभवाने काँग्रेस, शिवसेना उबाठा व राष्ट्रवादी शरद पवार गटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनोबल खचले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील या पक्षांमधील माजी आमदारांसह अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सत्ताधारी महायुतीमधील पक्षांची वाट धरली.आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीनेदेखील विरोधकांमधील या नेत्यांसाठी पायघड्या घातल्याने मागील काही महिन्यांत जळगाव जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या पाच माजी आमदार महायुतीत डेरेदाखल झाले.विरोधात राहून कार्यकर्त्यांची कामे पूर्ण होत नसल्याचे सांगत हे नेते सत्ताधारी पक्षात जात आहेत. सद्य:स्थितीत सत्ताधारी पक्षात सुरू असलेल्या पक्षप्रवेशांचा ओघ पाहता, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व काँग्रेस या पक्षासाठी परीक्षा पाहणाऱ्या ठरण्याची शक्यता आहे.

# शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची कार्यशाळा संपन्न



जनसंचलन/बुलडाणा

शाळेच्या दैनंदिन परिपाठापासून तर दिवसाअखेरच्या गृहपाठाच्या तासिकेपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याला कौशल्यविकासाची संधी उपलब्ध करून देणे हीच आता आधुनिक शैक्षणिक गुणवत्तेची परिभाषा नावरूपास येत असून त्यासाठी सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेने शिक्षकांना प्रेरीत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. बुलढाणा जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्यावतीने आज (दि. ११ जुलै) शुक्रवारी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय शैक्षणिक गुणवत्ता कार्यशाळेचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यशाळेप्रसंगी मंचावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, योजना शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली ठग, जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. समाधान डुकरे, डॉ. मारोती गायकवाड, उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलतांना डॉ. किरण पाटील म्हणाले की, लहान वयात अनेक कौशल्य सहजपणे शिकण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये उपजतच असते. तथापि ती संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आज माहितीतंत्रज्ञानाच्या युगात जगातील अनेक भाषा शिकण्याची संधी सुध्दा विद्यार्थ्यांना सहजपणे उपलब्ध होऊ शकते. एवढेच नव्हे तर आर्टीफिशिअल इंटिलिजन्स चा वापर दैनंदिन अध्यापनात करणे सुध्दा शक्य आहे. मात्र त्यासाठी आजचा शिक्षक हा स्वत: चौकस व जिज्ञासू असायला हवा. जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शिक्षकांशी संवाद साधण्याची इच्छा आहे. मात्र ते शक्य होत नसल्याची खंत देखिल जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी व्यक्त केली. तसेच केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दैनंदिन प्रभावी संनियंत्रणासाठी शाळा भेटी देऊन तळागाळातील प्रत्येक शिक्षकाला नव्या आव्हानांबाबत जाणीव करून द्यावी. सोबतच त्यांना विद्यार्थ्यांच्या कौशल्याधारीत शैक्षणिक विकासासाठी प्रेरीत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात म्हणाले की, ग्रामीण भागातील जनतेने मोठ्या विश्वासाने आपल्या जिल्हा परिषद शाळेत त्यांची पाल्य दाखल केलेली आहेत. अशावेळी त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रत्येक शाळेमधून विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण , मुलभूत भौतिक सुविधा व त्यांच्या क्षमता विकसित करणारे शिक्षण देणे ही आपल्या सर्व यंत्रणेची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपल्या पर्यवेक्षकीय भेटींची संख्या वाढवून याबाबींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. नुकत्याच सुरू झालेल्या शैक्षणिक सत्राच्या अनुषंगाने जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या वाढीसाठी घेषित केलेल्या पटसंख्या वाढवा-पारितोषिक मिळवा या आवाहनाला सुध्दा लक्षणीय यश मिळत असल्याचे सांगून जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्येत वाढ झाल्याचे समाधानकारक चित्र दिसून येत असल्याचे गुलाब खरात यांनी सांगितले. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा वाढावा यासाठी पुढील काळात आणखी नियोजनपूर्वक लक्ष केंद्रीत केल्या जाईल, असे सुध्दा गुलाब खरात यांनी सांगितले. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर यांनी शालेय शिक्षणातील नव्या संकल्पना , आव्हाने व संधी या विषयावर सर्व उपस्थित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सर्वंकष मार्गदर्शन केले. तर माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ यांनी प्रशासकीय जबाबदारी लक्षात घेऊन सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्येक शाळा गुणवत्तेच्या प्रवाहात समाविष्ट होईल यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. योजना विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली ठग यांनी शासनाच्या सर्व योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ होईल व निर्धारीत उद्दिष्ट साध्य होईल याकडे सुध्दा क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. कार्यशाळेचे प्रास्तविक प्राथमिक उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर यांनी केले. दिप प्रज्वलनाने कार्यशाळेचा आरंभ झाला. सूत्र संचलन शिक्षण विस्तार अधिकारी वृंदा कुळकर्णी यांनी केले.

# सौर पंपासाठी टॉवरवर चढून शेतकऱ्याचे आंदोलन!

जनसंचलन/मेहकर

सौर कृषी पंपासाठी आठ महिन्यांपासून पैसे भरूनही पंप मिळाले नसल्याने भोसा येथील शेतकरी विष्णू जयराम चंदनसे यांनी शुक्रवार, दि.११ जुलै रोजी सकाळी मेहकर येथील महावितरण कार्यालयाच्या टॉवरवर चढून आंदोलन केले. मेहकर तालुक्यातील भोसा गावातील शेतकऱ्यांनी सौर कृषी पंपासाठी शासन योजनेअंतर्गत अर्ज करून शुल्क भरले. काहींनी तर घरातील दागिने विकूनही पैसे उभे केले. मात्र, आठ महिन्यांपासून पाठपुरावा करूनही महावितरणकडून सौर पंपाचे कनेक्शन देण्यात आलेले नाही. शुक्रवार सकाळी साडेदहा वाजता चंदनसे हे महावितरण कार्यालयाच्या मागील टॉवरवर चढले. त्यांनी सुमारे तीन तास या टॉवरवर आंदोलन सुरू ठेवले. या प्रकारामुळे परिसरात नागरिकांची गर्दी झाली आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. उपकार्यकारी अभियंता कळसकर यांच्यासह अधिकाऱ्यांनी समजूत घालून आंदोलनाचा शेवट केला. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत होईपर्यंत प्रशासन काहीच करत नाही, याचे हे ज्वलंत उदाहरण असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी उमटल्या.



# विकसित महाराष्ट्र २०४७; नागरिक सर्वेक्षणामध्ये सहभागी होण्याचे आवाहन


जनसंचलन/बुलडाणा

विकसित महाराष्ट्र २०४७ करिता व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी १५० दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. त्याअनुषंगाने विकसित महाराष्ट्राची रूपरेषा ठरविण्यासाठी नागरिकांनी नागरिक सर्वेक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन नियोजन विभागामार्फत करण्यात आले आहे. विकसित महाराष्ट्रात सहभागी होण्यासाठी https://wa.link/o93s9m939 या लिंकचा वापर करावा. सर्वेक्षणात राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शासनाने सर्व विभागांना व प्रशासन यंत्रणेला व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये ग्रामसेवक, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, शाळा-महाविद्यालये, स्थानिक केबल नेटवर्क, एफ.एम. रेडिओ, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, बाजारपेठा, गावाच्या वेशीवर फलक, व्हाट्सअॅप ग्रुप, पथनाट्य आणि फिरती प्रचारवाहने आदी माध्यमांचा समावेश आहे. या सर्वेक्षणाद्वारे, नागरिकांना सहभागी होण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजनला आकार देण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. या सर्वेक्षणात ७ सोपे प्रश्न विचारले आहेत. आपण ऑप्शन्स निवडू शकता, लिहू शकता आणि आवाज रेकॉर्ड करू शकता. शासनाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत माहिती घेऊन, त्यानुसार रोडमॅप तयार करणे शक्य होणार आहे. त्यामुळे विकसित महाराष्ट्र २०४७ करिता नागरिक https://wa.link/o93s9m या लिंकवर क्लिक करून जिल्ह्यातील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# अनुसूचित जाती-जमाती शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन योजना; ९० टक्केपर्यंत अनुदानाचा लाभ

जनसंचलन/बुलढाणा

राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ङ्क्षङ्कप्रति थेंब अधिक पीकङ्क्षङ्क योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचनासाठी (ठिबक व तुषार प्रणाली) ९० टक्क्यांपर्यंत अनुदानाचा लाभ मिळणार आहे. इच्छुक पात्र अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांनी योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती-जमातीच्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के अनुदान तर इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान दिले जाते. त्यासोबतच मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून अनुक्रमे २५ टक्के (अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी) आणि ३० टक्के (इतरांसाठी) पुरक अनुदान देण्यात येते. उर्वरित अनुदानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेच्या माध्यमातून १० ते १५ टक्के पुरक अनुदान दिले जाते. त्यामुळे अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना एकूण मिळणारे अनुदान ९० टक्क्यांपर्यंत पोहोचते. योजनेचा लाभ घेण्यासाठी सातबारा व ८अ उतारे, आधार कार्ड, बँक पासबुक, फार्मर आयडी, सिंचन सुविधेची नोंद किंवा स्वयंघोषणापत्र आवश्यक आहे. योजनेचा लाभ अधिकतम ५ हेक्टर क्षेत्रापर्यंत देण्यात येतो. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या गावातील कृषि विभाग किंवा सीएससी केंद्रावर संपर्क साधावा.

# कढी-भात खाल्ल्याने तब्येत बिघडलेल्या १३ विद्यार्थिनींना रुग्णालयातून सुट्टी!

## जिल्हा शल्य चिकित्सक म्हणाले सर्वांची प्रकृती स्टेबल!



**जनसंचलन/ बुलढाणा**

पैनगंगा आदिवासी शाळेत काल रात्री कढी- भात खाल्ल्याने १३ विद्यार्थिनींची तब्येत बिघडल्याची घटना काल घडली होती. जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आलेल्या १३ पैकी ८ विद्यार्थिनींना काल तर आज सकाळी ५ विद्यार्थिनींना सुट्टी देण्यात आली आहे.सर्वांची प्रकृती स्टेबल असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी दैनिक जनसंचलन ला सांगितले. येळगाव येथील पैनगंगा आदिवासी आश्रमशाळेत कढी भात खाल्ल्यानंतर १३ विद्यार्थ्यांनींना उलटी-मळमळ व पोट दुखीचा त्रास होत असल्याची बातमी समोर आली होती. जिल्हा सामान्य रुग्णालयात ८ विद्यार्थिनींवर उपचारानंतर त्यांना शुक्रवारी घरी सोडण्यात आले होते.आज सकाळी देखील ५ विद्यार्थिनींना उपचार करून सोडण्यात आले आहे.

# मध्यरात्रीची ३ वाजताची वेळ.. चुकीला माफी नव्हतीच!

## पवार कुटुंबीयांच्या अंगाला घाम फुटला होता..!



**जनसंचलन/बुलढाणा**

मध्यरात्रीच्या ३ वाजताची वेळ म्हणजेच ११ जुलै ची पहाट होत असताना, ढवळ्या मातीच्या घरातील अचानक काही भांडे खाली पडल्याचा आवाज झाल्याने, साखरझोपेतील कुटुंब धाडकन जागे झाले..अन् त्यांच्या अंगाला घाम फुटला! कारण लाईट लावताच विषारी ५ फुटाचा कोब्रा धाव्यावर लटकत फुत्कार सोडत होता. भिका नारायण पवार रा.अजिसपुर यांच्या घरातील अंगावर शहारे आणणारा हा क्षण होता. परंतु सर्पमित्र श्रीराम रसाळ यांना फोन केल्याने, ते तत्काळ घटनास्थळी पोहोचून त्यांनी कोब्रा शिताफीने बरणीबंद केल्याने पवार कुटुंबीयसह उपस्थितांनी सुटकेचा श्वास सोडला. साप म्हटले की,अनेकांची भांबेरी उडते. हा सरपटणारा प्राणी मृत्यूत समजल्या जातो. त्याला धक्का जरी लागला तरी, त्याच्याकडे चुकीला माफी नाही! पावसाळी दिवसात बिळात पाण्याने शिरकाव केल्याने साप बाहेर पडतात. तसेही ते खाद्याच्या शोधात असतात. घरातील उंदीर खाण्यासाठी ते घरात शिरतात. ११ जुलै च्या मध्यरात्री तीन वाजता भिका पवार यांच्या घरात विषारी जातीच्या कोब्रा नागाने पवार कुटुंबीयांची झोप उडवली.पवार कुटुंबीयांनी आरडाओरडा करून शेजाऱ्यांना गोळा केले.परंतु एकाचीही हिम्मत या ५ फुटी लांबीच्या नागाला पकडण्याची झाली नव्हती.नागाचा फुत्कार सगळ्यांना घाम फोडणारा होता.दरम्यान सर्पमित्र रसाळ यांना फोन करून या घटनेची माहिती देण्यात आली.रसाळ यांनी कार्यतत्परता दाखवली आणि ३.४५ वाजता ते घटनास्थळी पोहोचले.तोपर्यंत नाग दडून बसला होता.त्याला धुंडाळून रसाळ यांनी मोठ्या शिताफीने बरणीबंद करून आज नैसर्गिक अधिवासात सोडले आहे.दरम्यान अजीजपुर येथील सुशील जगताप,पांडुरंग पवार,श्रीराम जगताप,शेषराव जगताप,शंकर जगताप, संदीप जगताप,अशोक राऊत,विशाल पवार, भगवान जगताप यांनी घटनेची अनुभूती घेत सर्पमित्र रसाळ यांचे आभार व्यक्त केले. यावेळी उपस्थितांना सर्पमित्र रसाळ यांनी साप विषयी मार्गदर्शन सुद्धा केले.

# सामनाला कोण हुंगते? शेट्टी काय तुमचा मायचा नवरा आहे काय?

## आमदार संजय गायकवाड यांचा संजय राऊतांवर घणाघात!






**जनसंचलन/बुलढाणा**

कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाणीच्या प्रकरणावरून शिवसेनेच्या सामना या मुखपत्रातून टीका होताच, आमदार संजय गायकवाड यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. पत्रकारांनी प्रश्न विचारताच त्यांनी थेट सामना आणि संजय राऊत यांच्यावर सडकून टीका केली. "सामनाला कोण हुंगते का? संजय राऊतला कोण हुंगते का?" असा घणाघात करत त्यांनी सामनाची भूमिका फोल असल्याचा आरोप केला. गायकवाड पुढे म्हणाले, बाळासाहेब ठाकरे यांनी जेव्हा शिवसेना स्थापन केली, तेव्हा पहिलं आंदोलन साउथ इंडियन लोकांविरुद्ध झालं. त्यांनी मुंबईत घुसून बार डान्स सुरू केले, मराठी संस्कृतीचा ऱ्हास केला. आज तुम्ही त्याच साउथ इंडियन शेट्टीच्या पाठीशी उभे राहता? इकडे मराठी-मराठी करता आणि तिकडे त्या शेट्टीवर एवढा पुळका का? तो शेट्टी काय संजय राऊतचा मायचा नवरा आहे का?" असा प्रश्न विचारत त्यांनी राऊतांवर थेट हल्ला चढवला. मी जे केलं ते योग्य केलं. तो शेट्टी आहे म्हणून तुम्हाला वाईट वाटतंय? सामनाच्याटीकेला सडेतोड उत्तर देताना संजय गायकवाड यांनी विरोधकांची बोलती बंद केली असून, त्यांच्या या आक्रमक विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण प्रकरणात आमदार संजय गायकवाड यांच्यावर अखेर गुन्हा दाखल!



**जनसंचलन/ बुलढाणा**

आकाशवाणी आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्या शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर अखेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.मंगळवारी खराब जेवण दिल्याच्या कारणावरून गायकवाड यांनी कॅन्टीन कर्मचाऱ्याला अमानुषपणे मारहाण केली होती. संबंधित घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्याच्या वेगाने व्हायरल झाला. नागरिक, सामाजिक संघटना व विरोधी पक्षांनी संतप्त प्रतिक्रिया देत, गायकवाड यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली होती. या दबावाला बळी पडत अखेर मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात आ.संजय गायकवाड यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ३५२, ११५(२) ३(५) अंतर्गत गुन्हानोंदवण्यातआला.

# वेळीच करा पैसा वाणी किडीचे नियंत्रण; कृषी विज्ञान केंद्राचा सल्ला

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सोयाबीन आणि इतर खरीप पिकांवर पैसा वाणी अ-कीटक वर्गीय किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्याचे कृषी विज्ञान केंद्र, बुलडाणा यांनी स्पष्ट केले आहे. या किडीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी सतर्क राहून योग्य उपाययोजना करण्याचे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रवीण देशपांडे व वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. ए. एस. झापे यांनी केले आहे. पैसा वाणी ही एक निशाचर कीड असून सामान्यतः सडणारी पाने, तसेच काडीकचरा, कुजणाऱ्या वनस्पती इत्यादी पदार्थांना खाऊन उपजीविका करत असते जेव्हा यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते तेव्हा ते जमिनीवर संपर्कात येणाऱ्या रोपावस्थेतील पिकांना खाऊन नुकसान करतात जमिनीलगत रोपे कोरतडून टाकतात. कालांतराने रोपांवर जाऊन पानेसुद्धा कुरतडतात यामुळे रोपांची संख्या कमी होऊन दुबार पेरणीची सुद्धावेळ येऊ शकते. या किडीच्या वाढीसाठी जमिनीत आद्रता असणे आवश्यक आहे. त्यामुळे पावसाळ्यात किंवा जिथे ओलीताची सोय अशा ठिकाणी ही किड जास्त सक्रिय असते. त्यामुळे खालील प्रमाणे उपयायोजना कराव्यात. नियंत्रणासाठी उपयायोजना: कृषी विज्ञान केंद्राने दिलेल्या सूचनांनुसार शेतकऱ्यांनी शेतातील पालापाचोळा व कुजलेला कचरा गोळा करून नष्ट करावा. रात्री गवताचे ढिग ठेवून सकाळी त्याखाली जमा झालेली वाणी साबण किंवा मिठाच्या द्रावणात टाकून नष्ट करावीत. बांधावरील गवत, दगड हटवून बांध मोकळा ठेवावा व शेतातील आर्द्रता कमी ठेवावी. वेळोवेळी कोळपणी करून जमिनीत लपलेल्या किडी व अंडी उघड्यावर आणावीत. पिक उगवल्यानंतर पैसा वाणीचा प्रादुर्भाव दिसल्यास क्लोरोपारीफॉस २० टक्के घटकयुक्त कीटकनाशक ३७.५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझल ढिले करून रोपांभोवती वर्तुळाकार किंवा सरळ ओळीत आळवणी करावी १ एकर क्षेत्रात ४० पंपाचे ड्रिंचेंग करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८